# वॉरेन बफेट- एक अभिजात गुंतवणूकदार

- डॉ. सोनल शरद बावकर

वॉरेन बफेट यांचा जन्म ३० ऑगस्ट १९३० अमेरिकेतील ओहामा या राज्यातील नेबरास्का या शहरामध्ये झाला. व्यावसायिकतेचे व गुंतवणुकीचे बाळकडूच त्यांना मिळाले होते. त्यांचे वडील हॉवर्ड बफेट व्यावसायिक व शेअर बाजारातील गुंतवणूकदार होते. त्यामुळे कमी वयातच वारेन बफेट यांना गुंतवणूक, व्यवसाय यामध्ये रस निर्माण झाला. ज्या वयात इतर मुले खेळ खेळत होती त्या वयात म्हणजेच वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी शीतपेय विकून आपल्यातील व्यावसायिक कौशल्याची चुणूक दाखवली. वयाच्या ११ व्या वर्षापासून शेअर ट्रेडिंग करायला चालू केले. पेनसिल्व्हेनिया विद्यापीठातील व्हार्टन व्यावसायिक व्यवस्थापन शाळेत त्यांनी व्यावसायिक शिक्षण घेतले. १६ व्या वर्षापर्यंत त्यांनी शेअर खरेदी-विक्री करून, तर कधी स्टॅम्प विकून, तर कधी गाड्यांची सफाई, तर कधी वृत्तपत्र विकून ५३,००० डॉलर इतके रुपये त्याकाळी कमावले. नंतर त्यांना कोलंबिया बिझनेस स्कूल मधील त्यांचे गुरु बेन्जामिन ग्राहम यांच्यासोबत काम करायचे होते.

दोन गोष्टी आहेत ज्यात तुम्ही सतत गुंतवणूक केली पाहिजे: एक म्हणजे तुमची पैसे कमवण्याची क्षमता आणि अशी क्षमता तयार करा कि पैशाने तुमच्यासाठी काम केले पाहिजे.- वॉरेन बफेट

ते एकदा असेच केस कापण्यासाठी न्हाव्याकडे गेले असता त्यांच्या लक्षात आले की, बराच वेळ वाट पहावी लागते व वेळ वाया जातो. तेव्हा अवघ्या १५ वर्षाचे असणारे बफेट यांनी २५ डॉलर्सची पिनबॉल गेम न्हाव्याच्या दुकानात स्थापन केली. येणारे गिऱ्हाईक वाट बघत बसण्यापेक्षा काही पैसे भरून नंबर येईपर्यंत खेळत राहील.त्यांची ही कल्पना येणाऱ्या गिऱ्हाईकाना आवडली व नंतर इतकी प्रसिध्द झाली कि नेबरास्का शहरात त्यांनी बऱ्याच ठिकाणी त्यांनी हि गेम स्थापन केली व नंतर हा व्यवसाय १२०० डॉलर्स मध्ये तो विकला. यातून असे दिसून येते की, व्यावसायिकतेचे बाळकडू त्यांना मिळाले होतेच पण यावेगवेगळ्या समस्या व त्यातून मिळणाऱ्या संधीमध्ये त्यांनी गुंतवणूक केली साहजिकच पैसा हा त्यांच्यासाठी काम करणार होताच. त्यांच्या या विद्यार्थी दशेत ते एखाद्या चांगल्या पदावर काम करणाऱ्या व्यक्ती जेवढे पैसे कमवू शकते

इतके ते पैसे कमवीत होते.

गुंतवणुकीच्या मूळ कल्पना म्हणजे शेअर्सकडे व्यवसाय म्हणून पाहणे, बाजारातील चढउतार तुमच्या फायद्यासाठी वापरणे आणि सुरक्षिततेचा फरकाने व्यापार करणे. – वॉरेन बफेट

प्रत्येकाच्या आयुष्याला एक महत्वाचे वळण देण्यामध्ये त्यांच्या गुरूंचा एक महत्वाचा वाटा असतो. असेच बफेट यांच्या बाबतीतही दिसून येते. बेन्जामिन ग्राहम यांनी शिकवलेल्या गोष्टींना त्यांनी तत्वे मानली जी आजही गुंतवणुकीचे आधारस्तंभ म्हणून मानले जातात. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर १९५१ ते १९५४ पर्यंत एका प्रायव्हेट कंपनीमध्ये सेल्समनची नोकरी केली. १९५४ ते १९५६ मध्ये बेन्जामिन ग्राहम यांच्यासोबत ग्राहम–न्यूमन कोर्पोरेशन मध्ये फायनान्शियल अॅनालीस्ट म्हणून काम केले. नंतर १९५६ ते १९६९ पर्यंत बफेट पार्टनरशिप लि.मध्ये भागीदार म्हणून काम केले व १९७० ला त्याच भागीदारी संस्थेचे 'बर्कशायर हाथवे' या कंपनीमध्ये रुपांतर करून त्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) झाले. हा जो अल्पावधीत प्रवास पाहता त्यांचे अंगभूत गुण व गुरूंकडून मिळालेल्या शिकवणीचा प्रभाव हा पाया मानता येईल.

वाजवी कंपनी चांगल्या किमतीत खरेदी करण्यापेक्षा चांगल्या कंपनीला वाजवी किमतीत खरेदी करणे कधीही चांगले – वॉरेन बफेट

ग्राहम यांच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर प्रभाव होताच परंतु कालांतराने त्यांच्यासोबत काम करताना दोघांच्या वैचारिक दृष्टीकोनात फरक पडत गेले याची परिनीती म्हणजे बर्कशायरची स्थापना होय. गुंतवणूक करताना कंपनीचा ताळेबंद, घेतलेले कर्जाचे प्रमाण, शेअर्स वर मिळणारा परतावा बघा म्हणजेच आकडेवारीनुसार प्रगती बघा पण बफेट यांचा दृष्टीकोन कंपनीच्या गुणात्मक वाढीकडे होता. त्यांचे म्हणणे होते की, आकडेवारीनुसार प्रगती बघणे आवश्यक आहेच पण त्यापेक्षाही कंपनीचा व्यवसाय बघा भविष्यातील त्या व्यवसायाची उपयुक्तता, धोरणे, व्यवस्थापन, नेतृत्व, काम करणारे मनुष्यबळ हे सर्व घटक देखील व्यवसायाच्या प्रगतीचे मापदंड असतात आणि हे पण पाहणे आवश्यक आहे. म्हणजेच गुंतवणूक करण्यापूर्वी व्यवसाय दीर्घकालीन चालेल की नाही हे पहा आणि मगच गुंतवणूक करा.

''तुम्ही १० वर्षांसाठी स्टॉक घेण्यास इच्छुक नसाल तर १० मिनिटांसाठी तो स्टॉक घेण्याचा विचारही करू नका.''– वॉरेन बफेट

वॉरेन बफेट हे बर्कशायरचे अध्यक्ष बनले तेव्हाच वयाच्या ३२ व्या वर्षी करोडपती झाले होते. माझा आवडता होल्डिंगचा कालावधी हा कायमचा आहे असे ते म्हणतात. यातून ते गुंतवणुकीचे अतिशय महत्वाचे तत्व सांगू इच्छितात. संयम आणि तर्कशुद्ध कृती हे यशस्वी गुंतवणुकीचे महत्वाचे पायाभूत घटक

आहेत. त्या काळात इतर व्यवसायाच्या संख्यात्मक वाढीकडे पाहून गुंतवणूक करत होते तेव्हा बफेट मात्र व्यवसाय कोणताही असो त्याची दीर्घकालीन वाटचाल अंदाज घेऊन गुंतवणूक करणे हि त्यांच्या यशाचे गमक होते. या तत्वावर त्यांच्या कंपनीने टेक्सटाइल, विमा, डीपार्टमेंटल स्टोर, वर्तमानपत्र व प्रसारण, कोको–कोला मध्ये तर ८ टक्के हिस्सा ज़ी त्यांच्या बर्कशायरची सर्वात फायदेशीर गुंतवणूक ठरली की अजून हि गुंतवणूक ठेवलेली आहे. ते अशा अनेक व्यवसायात गुंतवणूक केल्या आणि आजवर करत आहेत. सन १९९० मध्ये ते बिलेनिअर म्हणजे १०० कोटीचे मालक झाले होते. गुंतवणुकीचा हा प्रवास असाच चालू राहिला आणि २००८ मध्ये म्हणजेच ज्या वर्षात अमेरिकेने मंदी पाहिली त्याच वर्षात अमेरिकेचे वॉरेन बफेट हे मात्र जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती ठरले. त्यांच्या प्रगतीचा हा आलेख पाहता त्यांनी कधी अपयश पहिले का? हा प्रश्न पडतो. तर हार्वर्ड बिजनेस स्कूल ने नाकारलेले हेच ते विद्यार्थी, त्यांच्या कंपनीने केलेली टेक्सटाइल मधील गुंतवणूक कि जी तोट्यामध्ये विकावी लागली ते हेच गुंतवणूकदार तसेच २००७–०८ च्या मंदीतील नवीन उद्योगांमध्ये केलेली धाडसी गुंतवणूक कि ज्यामुळे त्यांच्यावर बरीच टीका केली गेली व त्या वर्षी कंपनीची ७७% मिळकत कमी झाली ते हेच. हे काही प्रसंग त्यांनीही पहिले तरीदेखील २००८ ला ते सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून सिद्ध झाले.आज बर्कशायरच्या ६० हून अधिक कंपन्यामध्ये गुंतवणूक आहेत. आज जगातील एक क्रमांकावर असलेल्या ॲपल कंपनीचे ७ टक्के गुंतवणुकीचा हिस्सा त्यांचा आहे. त्यांनी त्यांच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर ला लिहिलेली पत्रे जगविख्यात असून ज्या स्कूलने (हार्वर्ड) त्यांना नाकारले त्या स्कूलमध्ये त्यांच्या या पत्रांचा अभ्यास केला जातो.

एका उत्पन्नावर कधीही अवलंबून राहू नका. दुसरा स्त्रोत तयार करण्यासाठी गुंतवणूक करा.– वॉरेन बफेट

बफेट यांना व्यावसायिकतेचा वारसा वडिलांकडून तर लाभलेला होताच पण शिक्षण घेतानाच त्यांनी गुंतवणुकीचे महत्व ओळखले होते. त्यांचे म्हणणे असे आहे कि प्रत्येकाला कमावलेल्या पैशाचे योग्य पद्धतीने विनियोग करता आला पाहिजे. या स्पर्धात्मक युगात प्रगती करायची असेल तर फक्त कमविण्याच्या एका स्त्रोतावर अवलंबून राहून शक्य नाही त्यासाठी वेगवेगळे स्त्रोत तयार केले पाहिजेत. त्या स्त्रोतापैकी प्रमुख स्त्रोत गुंतवणूक हा आहे. जो पैशाच्या समय मूल्याच्या मानाने गुणाकार स्वरुपात मिळकत देत असतो. कोणत्याही व्यक्तीला वेळेच्या तुलनेत गतीने प्रगती करायची असेल तर त्याने गुंतवणुकीचा पर्यायाचा अवलंब करावा असे त्यांचे ठाम मत आहे. याचे बफेट स्वतः जिवंत उदाहरण आहेत. बफेट असे म्हणतात की लोक पैसा हातात आली की ऐहिक सुख उपभोग घेण्याच्या मागे लागतात त्यामुळे स्थिर स्वरूपाचा तसेच, भांडवली स्वरूपाचा खर्च करतात. आज जी वस्तू अथवा मालमत्ता लोकांना



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17

आवडतात त्या कालांतराने कालबाह्य होतात तसेच त्यांची उपयोगिता घटत असते व कालानुक्रमे नवनवीन पर्याय देखील मिळतात. अशा वेळी आधी खरेदी केलेली भांडवली वस्तूतील पैसे वाया जातात. हेच जर पैसे गुंतवणुकीमध्ये रुपांतरीत केले तर कालानुरूप त्याचे समय मुल्य वाढतच जाते. आज कोणीतरी सावलीत बसले आहे कारण कोणीतरी खूप पूर्वी झाड लावले आहे.'' हे त्यांचे म्हणणे येथे सिद्ध होते.

मी तुम्हाला श्रीमंत कसे व्हायचे ते सांगेन. दरवाजे बंद करा. जेव्हा इतर लोभी असतात तेव्हा घाबरून जा. जेव्हा इतर घाबरतात तेव्हा लोभी व्हा.- वॉरेन बफेट

तर्कशुद्ध विचार न करता इतरांचे अनुकरण करणे हि एक सामाजिक प्रवृत्ती आहे. शेअर बाजारात होणारे चढ उतार हे त्याचेच प्रतिबिंब आहे. बफेट असे म्हणतात कि जो व्यवसाय तुम्हाला कळत नाही त्यामध्ये तुम्ही गुंतवणूक करू नका कारण ''तुम्ही काय करत आहात हे माहीत नसल्यामुळे धोका निर्माण होतो.''मनुष्य हा नैसर्गिकत भावनिक दृष्ट्या प्रभावित निर्णय घेत असतो. शेअर्स खरेदी देखील कोणाच्या तरी सांगण्यावरून बर्याचदा केले जातात. ज्यावेळी सर्वचजण एखादा विशिष्ट शेअर बाजारातील उठलेल्या बातम्यावरून घेतात तेव्हा विकणारे त्यांचा नफा काढून घेत असतात. अंततः त्या शेअर्सचा भाव आपण जिथून खरेदी केला तिथून कोसळतो. म्हणून बफेट असे म्हणतात की जेव्हा इतरजण ज्या वेळी लोभी झाले तेव्हा काही करू नका. ज्यावेळी हे घाबरतील व काहीच करणार नाहीत तेव्हा तुम्ही लोभी व्हा. गुंतवणूक करण्याची योग्य वेळ म्हणजे ज्यावेळी शेअर बाजार उतरलेला असतो तेव्हाची वेळ होय. त्यांचे शब्द शब्द नाहीत ते जगासाठी जग आहेत.

**संदर्भ –**

The Essays of Warren Buffett : Lessons for Corporate America, Warren Buffett and Lawrence A. Cunningham, The Cunningham Group; revised edition (April 11, 2001), ISBN 978-0-9664461-1-1

Robert Hagstrom, The Warren Buffett Way.

https://www.sarwa.co/blog/warren-buffett-quotes

https://www.youtube.com/hashtag/warrenbuffett

वॉरेन बफेट यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास – https://www.biographymarathi.com/2020/06/warren-buffet-biography-in-marathi.html.

वॉरेन बफेट यांचे जीवनचरित्र – https://marathisuchak.com/warren-buffett-biography-marathi/

❧